असा. क्र. ३५

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६–०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जुलै १९, २००६ / आषाढ २८, शके १९२८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.**––महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियोजन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . | २५२-२५४ |

दिनांक ११ जुलै २००६ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक १९ जुलै २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९६४ चा महा. २०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये, खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :— १९६४ चा महा. २०.

" (इ१) " कंत्राटी शेती " याचा अर्थ, कंत्राटी शेती उत्पादकाने कंत्राटी शेती पुरस्कर्त्याबरोबर केलेल्या लेखी कराराअन्वये केलेली शेती, असा आहे व अशा शेतीचे उत्पन्न, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याकडून खरेदी केले जाईल असा त्या कराराचा आशय असेल व तसे त्या करारात विनिर्दिष्ट केलेले असेल ;

(इ२) " कंत्राटी शेती करार " याचा अर्थ, कंत्राटी शेतीसाठी केलेला लेखी करार, असा आहे ;

(इ३) " कंत्राटी शेती उत्पादक " याचा अर्थ, ज्याने कंत्राटी शेती करारानुसार कृषि उत्पन्न काढून त्याचा पुरवठा करण्याचे मान्य केले असेल, असा शेतकरी किंवा शेतकऱ्यांचा संघ, असा आहे ;

(इ४) " कंत्राटी शेती पुरस्कर्ता " याचा अर्थ, जिने कंत्राटी शेती करार केला असेल अशी व्यक्ती, असा आहे ; ".

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० यामध्ये प्रकरण एक-क समाविष्ट करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ड नंतर, पुढील प्रकरण समाविष्ट करण्यात येईल :—

## " प्रकरण एक-क
## कंत्राटी शेती करार

कंत्राटी शेती कराराची कार्यपद्धती आणि नमुना.

**५ई.** (१) कंत्राटी शेती पुरस्कर्ता, विहित करण्यात येईल अशा रीतीने, बाजार समितीकडे किंवा विहित अधिकाऱ्याकडे स्वतःची नोंदणी करील.

(२) कंत्राटी शेती पुरस्कर्ता, कंत्राटी शेतीच्या कराराची, याबाबतीत विहित केलेल्या अधिकाऱ्याकडे अभिलिखित करील. कंत्राटी शेती करार, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, असा तपशील आणि अशा अटी व शर्ती अंतर्भूत असलेला असेल.

(३) कंत्राटी शेती करार किंवा भारतीय संविदा अधिनियम, १८७२ किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कंत्राटी शेती उत्पादकाच्या शेतजमिनीचा कोणताही मालकी हक्क किंवा अधिकार किंवा तिची मालकी किंवा ताबा, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याकडे किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याकडे किंवा त्याच्या अभिकर्त्याकडे हस्तांतरित, अन्यसंक्रामित अथवा निहित करण्यात येणार नाही. १८७२ चा ९.

(४) कोणत्याही कंत्राटी शेती करारातून उद्‌भवलेला विवाद मिटविण्यासाठी, तो विवाद, याबाबतीत विहित केलेल्या समेट प्राधिकाऱ्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल. समेट प्राधिकारी, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यावर, तो विवाद, तीस दिवसांच्या आत संक्षिप्त पद्धतीने मिटवील.

(५) पोट-कलम (४) खालील, समेट प्राधिकाऱ्याच्या निर्णयाने व्यथित झालेल्या पक्षकारास, त्या निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, याबाबतीत विहित करण्यात येईल अशा अपील प्राधिकाऱ्याकडे अपील दाखल करता येईल. अपील प्राधिकारी, पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यावर, तीस दिवसांच्या आत ते अपील निकालात काढील आणि अपील प्राधिकाऱ्याचा त्याबाबतचा निर्णय अंतिम असेल.

(६) पोट-कलम (४) खालील, समेट प्राधिकाऱ्याचा निर्णय आणि पोट-कलम (५) खालील अपील प्राधिकाऱ्याचा अपिलावरील निर्णय हे, दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे प्रभावशाली असतील आणि त्याप्रमाणे ते बजावणीयोग्य असतील, आणि हुकूमनाम्याची रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(७) कंत्राटी शेती कराराशी संबंधित असणाऱ्या आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या विवादाला कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

(८) कंत्राटी शेती कराराखालील कृषि उत्पन्नाची बाजारतळाबाहेर, कंत्राटी शेती पुरस्कर्त्याला विक्री करता येईल आणि अशा प्रकरणी, कोणतीही बाजार फी आकारणीयोग्य असणार नाही.''.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६० च्या पोट-कलम (२) मधील, खंड (अ-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६० ची सुधारणा.

''(अ-२) कलम ५इ अन्वये कंत्राटी शेती पुरस्कर्त्याला ज्याच्याकडे आणि ज्या रीतीने स्वतःची नोंदणी करता येईल असा अधिकारी आणि अशी रीत विहित करणे, कंत्राटी शेती कराराचा नमुना, तसेच कंत्राटी शेती पुरस्कर्त्यास ज्याच्याकडे कंत्राटी शेती करार अभिलिखित करून घेता येईल असा अधिकारी, विहित करणे, कोणत्याही कंत्राटी शेती करारातून उद्‌भवलेला विवाद ज्याच्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात येईल असा समेट प्राधिकारी विहित करणे, आणि समेट प्राधिकाऱ्याच्या निर्णयाविरुद्ध ज्याच्याकडे अपील दाखल करता येईल असा अपील प्राधिकारी विहित करणे ;''.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई